# शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे कार्यालय

१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०-२६१२२२१७

ई मेल आय.डी.क्रं *dydpune@gmail.com* वेब साईट क्रमांक *www.dydepune.com*


**कालमर्यादीत**

**जा.क्र.उमाशि-२/शि.मा./पुवि/१४-१५/**
**दिनांक : २७/४/२०१५**

28 APR 2015

**प्रति**

**प्राचार्य/प्राचार्या,**
**उच्च माध्यमिक विद्यालय/कनिष्ठ महाविद्यालय,**
**पुणे / सोलापूर / अहमदनगर.**

**विषय :- विनाअनुदानीत तत्वावरील तत्वावरील नियुक्त झालेले कर्मचारी, शासनाने जी रिक्त पदे भरण्यास ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहेत अशी पदे तसेच २००७-०८ ते २०१०-११ या वर्षातील शासनाने मान्य केलेली वाढीव पदे इ.वैयक्तिक शिक्षक/शिक्षण सेवक शिक्षकेतर कर्मचारी नियुक्तीस मान्यता मिळणेबाबत.**

**संदर्भ :-**
**१) शा.नि.क्रं.संकीर्ण-१०९९/(२५५/९९)/माशि-२/ दिनांक ६/९/१९९९**
**२) शा.नि.क्रं.एसएसएन-१००७/(३६५/०७)/माशि-२/ दिनांक ६/२/२०१२**
**३) शा.नि.क्रं.संकीर्ण-२०१२/(२०९/१२)/प्राशि-२/दिनांक ६/९/२०१२**
**४) मा. शिक्षण संचालनालयाकडील क्रं. एचएससी/१५२०११/३१५५४/१२एचएस /३०४८ दिनांक २५/३/२०१२**
**५) शा.नि.क्रं.एसएसएन-१००८/(२००/०८)/माशि-२/दिनांक २३/१०/२०१३**
**६) शा.नि.क्रं.एसएसएन-२०१४/(१/१४)/टिएनटी-२/ दिनांक २०/६/२०१४**
**७) शा.नि.क्रं.एसएसएन-२०१४/(१/१४)/टिएनटी-२/ दिनांक १९/७/२०१४**
**८) मा. शिक्षण संचालनालयाकडील क्रं. उच्च माध्य-२४३/वैय.मान्य/शिबीर दिनांक २३/४/२०१५**

शासन निर्णय दिनांक ६/९/२०१२ अन्वये दिनांक २ मे २०१२ नंतर भरतीस प्रक्रियेस असलेली बंदी शासन निर्णय क्रमांक दिनांक २०/६/२०१४ अन्वये उठविण्यात आलेली आहे. विनाअनुदानीत तत्वावरील तत्वावरील नियुक्त झालेले कर्मचारी, शासनाने जी रिक्त पदे भरण्यास ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहेत अशी पदे तसेच २००७-०८ ते २०१०-११ या वर्षातील शासनाने मान्य केलेली वाढीव पदे यांना वैयक्तिक मान्यता देणेसाठी वैयक्तिक मान्यता शिबिराचे आयोजन करण्यास मा. शिक्षण संचालनालयाने संदर्भीय क्रं. ८ च्या पत्रान्वये परवानगी दिलेली आहे.

तसेच माहे डिसेंबर २०१३ व डीसेंबर २०१४ मध्ये शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी कर्मचारी मान्यता शिबिरातील प्रलंबीत तसेच नस्ती मध्ये शाळा / संस्था यांचेकडून त्रुटींची पूर्तता झालेली असल्यास असे प्रस्तावांना मान्यता देण्याबाबत माहे मे २०१५ मध्ये दिनांक **५/५/२०१५ व २२/५/२०१५** रोजी **नौरासजी वाडीया कॉलेज, पुणे १** येथे शिबीर आयोजित करण्यात येत आहे.

आवश्यक ती सर्व कागदपत्रे सादर केल्यास मान्यता प्रस्तावावर निर्णय देणे शक्य होईल. प्रस्तावासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती संबंधित प्राचार्यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे व नस्तीतील कागदपत्रांना पृष्ठक्रमांक देऊन अनुक्रमणिका जोडणे आवश्यक आहे. आपणास कळविणेत येणाऱ्या वेळापत्रकाप्रमाणे प्रस्ताव मान्यता शिबीरात सादर करावेत. अपूर्ण प्रस्ताव सादर केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांवर राहील व विलंबास त्यांना वैयक्तिक जबाबदार धरले जाईल याची नोंद घ्यावी.

शिक्षक मान्यता प्रस्ताव सादर करण्यासाठी जिल्हावार फाईल्सचे रंग खालील प्रमाणे

१) पुणे - **पिवळा** २) सोलापूर - **तांबडा**

३) अहमदनगर - **हिरवा**

संस्था प्रमुख व प्राचार्य यांचे प्रस्ताव सदर शिबिरात सादर करण्याबाबतचे मुद्दे खालीलप्रमाणे

१. पुर्णवेळ, अर्धवेळ, प्रतिघडयाळी तास तत्वावरील नियुक्त केलेल्या शिक्षकांचा मान्यतेचा प्रस्ताव आपणास नेमून दिलेल्या तारखेस दुपारी १२.०० पूर्वी शिबिरात सादर करणे आवश्यक आहे.

२. या पूर्वीच्या शिक्षक मान्यता शिबीरात प्राप्त झालेल्या प्रस्तावातील आक्षेप संबंधित कनिष्ठ महाविद्यालये/ उच्च माध्यमिक विदयालयांना कळविलेले आहेत. सदर आक्षेपांची पूर्तता होत असेल तरच या शिबिरात प्रस्ताव सादर करावा. अपूर्ण प्रस्ताव सादर होणार नाही याची दक्षता संस्था प्रमुख/प्राचार्यांनी घ्यावी.

३. शिबीराच्या वेळापत्रकाप्रमाणेच परिपूर्ण प्रस्ताव शिबिरात दाखल करुन निर्णय प्राप्त करुन घ्यावेत. शेवटच्या दिवशी अनावश्यक गर्दी करणे टाळण्यात यावी.

४. प्रस्ताव जाणकार लिपीकाबरोबरच शिबिरात सादर करावा. प्राचार्यांनी शिबीरात उपस्थित राहणे आवश्यक आहे. संबंधित शिक्षक किंवा अन्य कर्मचारी यांना शिबीरासाठी पाठवू नये याची नोंद घ्यावी.

५. शिबरात नियुक्त शिक्षकासोबत मान्यतेचा प्राताव दाखल केल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल.

६. या शै. वर्षातील हे शेवटचे शिक्षक मान्यता शिबीर असल्याने शिबीराचा कालावधी संपल्यानंतर दिनांक २२/५/२०१५ नंतर प्रस्ताव कार्यालयात दाखल करुन नयेत. त्याची दखल घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी

७. शिक्षण उपसंचालक यांना अचानक उद्‌भवलेल्या अन्य महत्वाच्या कामामुळे शिबीरात उपस्थित राहाता आले नाही तर सदर दिवशी दाखल झालेल्या प्रस्तावावर निर्णय कोणत्या तारखेस मिळेल याची माहिती शिबिरात दिली जाईल.

वरील बाबींचे काटेकोर पणे पालन करुन परिपूर्ण प्रस्ताव शिबिरात दाखल करणे व मान्यता प्राप्त करुन घेणे याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहील.

**सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या www.dydepune.com संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.**

27.4.15

**(रामचंद्र जाधव)**
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग, पुणे-१.**

**प्रत- माहितीस्तव सविनय सादर.**

**१. मा. आयुक्त (शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे १**

**२. मा. शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक )**
**शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर**

**प्रत - ३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, पुणे/सोलापूर/अहमदनगर**
/- यांनी शिबीराचे वेळापत्रक व ठळक मुद्दे या बाबींना आपल्या जिल्हयांच्या स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

**प्रत - ४. प्राचार्य , नौरासजी वाडीया कॉलेज, पुणे १**
**/- यांनी शिक्षक मान्यता शिबीराच्या वेळी आवश्यक त्या भौतिक सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात.**

## शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पुणे विभागातील शिक्षक / शिक्षकेतर / शिक्षणसेवक मान्यता शिबीराचे वेळापत्रक

**वेळ :- सकाळी १० ते दुपारी २.००** **दुपारी २.३० ते ५.४५**

| अ. क्र. | दिनांक | तालुके | स्थळ |
|---|---|---|---|
| १. | ५/५/२०१५ | माहे डिसेंबर २०१३ व डीसेंबर २०१४ मध्ये शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी कर्मचारी मान्यता शिबिरातील प्रलंबीत तसेच नस्ती मध्ये शाळा / संस्था यांचेकडून त्रुटींची पूर्तता झालेले प्रस्ताव. **सोलापूर, अहमदनगर व पुणे** | **नौरोसजी वाडीया कॉलेज, पुणे १** |
| २. | ६/५/२०१५ | | |
| ३. | ७/५/२०१५ | | |
| ४. | ८/५/२०१५ | | |
| ५. | ११/५/२०१५ | शासनाने जी रिक्त पदे भरण्यास (NOC) ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहेत अशी पदे त्यावरील नियुक्त कर्मचारी मान्यता प्रस्ताव. **सोलापूर जिल्हा** | **नौरोसजी वाडीया कॉलेज, पुणे १** |
| ६. | १२/५/२०१५ | | |
| ७. | १३/५/२०१५ | शासनाने जी रिक्त पदे भरण्यास (NOC) ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहेत अशी पदे त्यावरील नियुक्त कर्मचारी मान्यता प्रस्ताव. **अहमदनगर जिल्हा** | **नौरोसजी वाडीया कॉलेज, पुणे १** |
| ८. | १४/५/२०१५ | | |
| ९. | १५/५/२०१५ | शासनाने जी रिक्त पदे भरण्यास (NOC) ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहेत अशी पदे त्यावरील नियुक्त कर्मचारी मान्यता प्रस्ताव. **पुणे जिल्हा** | **नौरोसजी वाडीया कॉलेज, पुणे १** |
| १०. | १६/५/२०१५ | | |
| ११. | १८/५/२०१५ | विनाअनुदानीत तत्वावरील तत्वावरील नियुक्त झालेले कर्मचारी प्रस्ताव. **सोलापूर** | |
| १२. | १९/५/२०१५ | विनाअनुदानीत तत्वावरील तत्वावरील नियुक्त झालेले कर्मचारी प्रस्ताव. **अहमदनगर** | |
| १३. | २०/५/२०१५ | विनाअनुदानीत तत्वावरील तत्वावरील नियुक्त झालेले कर्मचारी प्रस्ताव. **पुणे** | |
| १४. | २१/५/२०१५ | | |
| १५. | २२/५/२०१५ | उर्वरीत राहीलेले क. म. वि. सर्व जिल्हा | |

**सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या www.dydepune.com संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.**

**(रामचंद्र जाधव)**
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग, पुणे.१**